# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ३०/०९/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दि. ३०/०९/२०१० रोजी सभा सुचना क्र. १० दि. २४/०९/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासिन अधिकारी म्हणून श्री. याकुब कुरेशी हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| २) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ४) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ५) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ६) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ७) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ८) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ९) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १०) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| ११) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १२) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १३) | सौ. निर्मला सावळे | -- | सदस्या |
| १४) | सौ. अनिता पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |

**नगरसचिव :-**

सभागृहाच्या परवानगीने बोलतो. आजच्या सभेला नियोजित सभापती साहेब नसल्यामुळे उपस्थित सदस्यापैकी एका सदस्याची सभापती म्हणुन नेमणुक करावी. नंतर सभेचे कामकाज सुरू होईल. त्या सुचवलेला नावाला दुसऱ्याने अनुमोदन द्यावे अशी मी विनंती करतो.

**अनिल सावंत :-**

आजच्या सभेसाठी सन्मा. सदस्य याकुब कुरेशी यांच नाव मी सभापती पदासाठी प्रपोज करतो.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**याकुेब कुरेशी (पिठासीन अधिकारी) :-**

सर्व स्थायी समितीच्या नगरसेवक, नगरसेविकांनी मला अध्यक्षपदी नियुक्ती केली त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो. तसेचसचिव साहेबांनी कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. ३०/०९/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १०, दि. २४/०९/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ७४, दि. ०२/०२/२०१० व दि. २५/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब पेज नं. २८ मध्ये आपण मा. महासभेमध्ये ठराव केला होता. रेनवॉटर हार्वेस्टींग अपारंपारिक उर्जा स्त्रोत्र सांडपाण्याचे......

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेमध्ये ठराव झालेला आहे.

**अनिल सावंत :-**

कधी?

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेमध्ये ठराव झालेला नाही.

**अनिल सावंत :-**

ठराव झालेला आहे. ५ टक्के कन्सेशन द्यायचे. सोलर एनर्जी, रेन वॉटर हार्वेस्टिंग नकार कोण देईल?

**जुबेर इनामदार :-**

ठराव केलेला आहे. ५ टक्के, ५ टक्के आणि १० टक्के कचऱ्याच्या व्हिलेव्हाट स्वतः लावला तर १० टक्के

**मा. आयुक्त :-**

माझ्याकडे अजुन ठराव आलेला नाही. जर ठराव आला असेल तर अंमलबजावणी होणार ना.

**अनिल सावंत :-**

ह्याच्यामध्ये अस आहे की, काही प्रस्ताव आपल्या जवळ आलेले आहेत. पण त्याच्यावर कारवाई कशी करायची ते अजून कुठच्याच डिपार्टमेंन्टला माहित नाही. म्हणजे ते व्हेरिफाय कोण करणार? ४-५ प्रस्ताव तर मी दिलेले आहेत. कारण माझ्या वॉर्ड मध्ये आहे. ड्रेन वॉटर हार्वेस्टींग.

**मा. आयुक्त :-**

ड्रेन वॉटर हार्वेस्टींग डी.सी. रूल मध्ये तर प्रोव्हीजन आहे. कंम्पलशनच आहे.

**अनिल सावंत :-**

कंम्पलशन करत कोण? आपण त्यावेळी मा. महासभेमध्ये असा ठराव करून घेतला की, ज्या जुन्या बिल्डींग जर, ड्रेन वॉटर हार्वेस्टींग प्लान चालू करत असतील. त्यांना सुध्दा ५ टक्के सुट देण्यात यावी.

**मा. आयुक्त :-**

ते तुम्ही आणाना.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये गृह निर्माण सोसायटी व ले आऊट मध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावणे. मी मागे मशिन बसवण्याचा प्रस्ताव दिला होता. समजा, एखाद्या कॉम्प्लेक्स मध्ये त्यांची ती मशिन बसवली आणि स्वतःच कचऱ्याची व्हिलेव्हाट लावली होती. त्यांनी कंपोज खंत तयार करून गार्डन मेन्टेन केल. तर त्यांना तुम्ही ५ टक्के सुट द्यायला बांधिल आहात ना.

**मा. आयुक्त :-**

हो. म्हणजे त्यांचा कचरा बाहेर आला नाही पाहिजे.

**अनिल सावंत :-**

मग, त्यांच सुध्दा रूल्स आणि रेग्युलेशन बनवायला लागतील.

**जुबेर इनामदार :-**

दि. ०२/०२/२०१० व दि. २५/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अनिता पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**याकुब कुरेशी (पिठासीन अधिकारी) :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७४ :-**

दि. ०२/०२/२०१० व दि. २५/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६६ :-**

दि. ०२/०२/२०१० व दि. २५/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

आजच्या सभेला आरोग्य विभागाची ५ अवलोकन आलेली आहेत. २ (के) खाली आलेले आहेत. तर सभागृहाची मान्यता असेल तर तो विषय पटलावर घेण्याची मंजुरी द्या. एक संगणक चालकाचा विषय आहे. १ अवलोकन आहे. अणि १ पाणी पुरवठ्याचा विषय आहे. असे तीन विषय आलेले आहेत. अवलोकन शेवटी घ्या. बाकी संगणक चालकांचे विषय पहिले घ्या.

**निर्मला सावळे :-**

प्रकरण क्र. ७५, अस्थायी संगणक चालक यांचे तात्पुरते नेमणुकीबाबत तसेच मुदतवाढीबाबत विचार वितनयम करुन निर्णय घेणे. ठराव, महानगरपालिकेत प्रत्येक विभागाचे संगणीकरण करण्यात आले असून संगणीकरण केल्यामुळे महापालिकेत दि.२०/०६/२००६ पासून अस्थायी संगणक चालक यांची मानधनावर मा. महासभेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली असून त्यावेळेपासुन त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु सद्यस्थितीत १४ संगणक चालक हे सोडुन गेलेले आहेत. त्यामुळे विविध विभागात संगणकीय काम करतांना संगणक चालका अभावी फार गैरसोयीचे होते. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात विशेषतः नागरी सुविधा केंद्रात जन्म मृत्यु विभाग, पाणी पुरवठा, कर विभाग इ. कामकाज चालते तेथे नागरिकांची नियमिती ये-जा असते अशा वेळी तेथे संगणक चालक उपस्थित असणे आवश्यक आहे. परंतु बरेच संगणक चालक सोडुन गेलेले असल्यामुळे खालील उमेदवारांची तात्पुरते संगणक चालक पदासाठी नेमणुक करण्यांत आली आहे.

| अ.क्र. | संगणक चालकाचे नाव | तात्पुरती नेमणूक दिनांक |
|---|---|---|
| १ | कु. मेरी प्रसया | १५/०९/२००९ |
| २ | कु. विक्रम विलास नाईक | २१/०७/२०१० |
| ३ | कु. गौरी विठ्ठल खराडे | २१/०७/२०१० |
| ४ | कु. प्रमोद दत्तात्रय पाटील | २१/०७/२०१० |
| ५ | कु. चेताली ह. मानकर | २१/०७/२०१० |
| ६ | कु. प्रविणा वि. सडवेलकर | २१/०७/२०१० |
| ७ | कु. स्वाती रविंद्र पाटील | २१/०७/२०१० |
| ८ | कु. भावना चं. पाटील | २१/०७/२०१० |

कु. मेरी प्रसया यांची प्रथम तात्पुरत्या पाच महिन्यांसाठी मानधनावर नियुक्ती दिलेली असल्याने सदरची मुदत दिनांक १४/०२/२०१० रोजी संपलेली असून त्यांना एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्यांकरिता तात्पुरती मानधनावर नियुक्ती दिलेली आहे. सदरची मुदत दिनांक १५/०८/२०१० रोजी संपली असल्याने संगणक चालकांची आवश्यकता पाहता एक दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्यांकरिता तसेच वरील सर्व संगणक चालकांना मा. महासभा दि. १८/०६/२००९ ठराव क्र. ५ नुसार रु. ५०००/- प्रति महिना (२६ दिवसा करिता) या मानधनावर सहा महिन्यांकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कमल ५३(१) अन्वये तात्पुरती नेमणुक केली आहे. सदर तात्पुरत्या संगणक चालकांच्या नेमणुकीस ही सभा मंजुरी देत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, आपले जुने संगणक चालक किती शिल्लक आहे.

**गोविंद परब :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपल्याकडे ८७ संगणक चालक होते. त्यापैकी १४ जण नाही येत. त्या १४ मध्ये २-३ जण प्रसुती रजेवर असल्यामुळे गैरहजर आहेत. त्यामुळे मी काही म्हणत नाही. पण १४ जण जवळ-जवळ सोडून गेलेले आहे. त्याऐवजी आपण हे ८ जण घेतलेले आहेत. ८१ संगणक चालक सध्या कार्यरत आहेत. २-३ फक्त येत नाही.

**अनिल सावंत :-**

८१ पूर्ण कार्यरत आहेत.

**गोविंद परब :-**

२-३ नाही आहेत. कारण ते प्रसुती रजेवर आहेत.

**अनिल सावंत :-**

कधी पासुन हे संगणक चालक आहेत?

**गोविंद परब :-**

२००६ पासून आहेत. आपण फेर प्रस्ताव पाठवला आहे. मा. महासभेतुन

**अनिल सावंत :-**

काय?

**गोविंद परब :-**

की, मान्यता द्यावी म्हणुन.

**अनिल सावंत :-**

आस्थापनेवर घेण्यासाठी.

**गोविंद परब :-**

हो.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेबांनी प्रस्ताव पाठवला आहे का?

**गोविंद परब :-**

हो. पाठवला आहे.

**अनिल सावंत :-**

आता याच्यामध्ये ठोक मानधन पालिका देते की, ठेकेदार देतो?

**गोविंद परब :-**

डायरेक्ट पालिका देते.

**अनिल सावंत :-**

त्यांना तुम्ही आता किती पगार देता?

**गोविंद परब :-**

संगणक चालकांना ५ हजार रू. देतो.

**अनिल सावंत :-**

२००४ पासुन तेवढाच आहे.

**गोविंद परब :-**

नाही. आता वाढवला आहे. पहिला कमी होता.

**अनिल सावंत :-**

मिनिमम वेजेस अक्ट प्रमाणे किती आहे?

**गोविंद परब :-**

मिनीमम वेजेस ॲक्ट प्रमाणे जास्त असायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

किती आहे?

**गोविंद परब :-**

नक्की माहिती नाही. पण साधारणतः ६-७ हजार रू. पाहिजे. लघुलेखकांना ६००० रू. देतो.

**अनिल सावंत :-**

ते कमी असतील ना.

**गोविंद परब :-**

ते २ च आहेत. २ लघुलेखक सोडून गेले.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, जुन्या संगणक चालकांपैकी ८१ संगणक चालक आज आपल्याजवळ काम करतात. २००४ पासुन आणि त्यांना आता पालिका पगार देते. म्हणजे ठेकेदार नाही. आणि परब साहेबांनी सांगितल्याप्रमाणे की, तुम्ही शासनाजवळ प्रस्ताव पाठवला की, ह्यांना कायम स्वरूपी करून घेण्याबाबत ते कुठपर्यंत आल? ते पॉझीटिव्ह होईल?

**मा. आयुक्त :-**

वाटत नाही. कारण 'ड' वर्ग महापालिकेला ३५ टक्के खर्च आहे. ३५ टक्के खर्चाच्या वर गेल तर पद मंजूर होत नाही.

**अनिल सावंत :-**

मग, आता आपण परत जे ८ नविन भरती केली आहे. साहेब २००४ पासुन ते काम करत आहेत. इतर ठिकाणी कुठेही नोकरी मिळण्याची शक्यता नाही. आणि हे जे लोक आहेत ते सर्व स्थानिक आहेत.

**मा. आयुक्त :-**

येताना माहिती झाल. की, अस कायम स्वरूपी करण्यात येणार नाही. ही त्यांना ही कल्पना होती.

**अनिल सावंत :-**

म्हणुन या ८ जणांची आपण परत लाईफ स्पॉईल करतो. त्यांना नेमणुक करून.

**मा. आयुक्त :-**

ते स्वतःहून आले. आणि त्यांना दुसरीकडे कुठे सोय नाही म्हणुन आता तात्पुर्ती चालवण्यासाठी. त्यांना नोकरी लागली तर ते जातील. तुम्ही दुसरीकडे नोकरीला अर्ज करू नका. अस आम्ही बोललो नव्हतो.

**अनिल सावंत :-**

पेमेंट आपण देतो. ठेकेदार नाही.

**मा. आयुक्त :-**

तो प्रश्न वेगळा आहे. परंतु, आम्ही त्यांना आता जेवढे आहे तेवढ्यांना दुसरीकडे अर्ज करू नका. तुम्हाला चांगली नोकरी मिळाली तर जावु नका.

**अनिल सावंत :-**

अस होत नाही ना. स्थानिक आहेत जवळ आहेत. म्युनिसिपाल्टीमध्ये नोकरी मिळते म्हणुन येतात ना. आणि हो काम पण करतात ना अस नाही आहे की काम करत नाही.

**मा. आयुक्त :-**

कॉंग्रेसची सरकार आहे. शासनाकडून मंजुरी आणा. मग, आपण करू.

**अनिल सावंत :-**

आता तुम्ही जे पेमेंट करता. या लोकांना आपण ५०००/- रू. पेमेंट देतो. ते मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे आहे का? महाराष्ट्र शासनाच्या शिक्षकांसाठी त्यांना वेगळा जी.आर. आहे. कॉन्ट्रक्ट पध्दतीने घ्या म्हणून.

**मा. आयुक्त :-**

तुमच म्हणन काय आहे?

**अनिल सावंत :-**

मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे तरी द्यायला पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

मिनिमम वेजेस ॲक्ट फक्त कामगारांसाठी आहे. बाकीच्या लोकांसाठी नाही.

**अनिल सावंत :-**

ते पण कामगारच आहे ना.

**मा. आयुक्त :-**

मिनिमम वेजस ॲक्ट हा मजुरांसाठी आहे. हायर लोकांना नाही आहे.

**अनिल सावंत :-**

आहे ना. क्लार्कला का नाही आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही आहे.

**अनिल सावंत :-**

क्लार्कला सिक्स पे कमिशन मध्ये तुमचे मिनिमम वेजेस नाही आहे किती द्यायचे ते.

**मा. आयुक्त :-**

मिनिमम वेजेस परमनन्ट स्टाफला आहे. तशी तुमची इच्छा असेल तर उद्यापासून बंद करून टाकू.

**अनिल सावंत :-**

आता तुमच काम होत नाही म्हणुन तुम्ही भरती करतात.

**मा. आयुक्त :-**

आम्हाला नको. हे काही काहींच सांगन येत म्हणुन जे १५-१६ सोडून गेले त्याच्या ऐवजी यांना घेतल.

**जुबेर इनामदार :-**

निर्णय घेण्यात आला होता की, आपले स्थायी कर्मचारी आहेत त्यांनी संगणक शिकाव. ते अजून शिकले नाही वाटत म्हणून आपल्याला बाहेरचे ६ जण घ्यायला लागले. त्यांच काय त्यांना कमी करणार.

**मा. आयुक्त :-**

त्यांच म्हणन आहे की, त्या सगळ्यांच इंक्रिमेन्ट स्टॉप करा. जे शिकले नसतील त्यांच इंक्रिमेन्ट स्टॉप करा. त्यांच्यावर बंधनकारक आहे. ज्यांना ट्रेनिंग देवून ही ते शिकले नाही तर सर्व्हिस पुस्तकावर नोंद घ्या. श्री. परब जे शिकले नाही आणि ते संगणक चालवत नाही. बाईंडेड असताना पण म्हणजे ते क्वॉलिफाईड नाही. म्हणजे त्यांना संगणक चालवण कंम्पलशन आहे. तर त्यांची सर्व्हिस पुस्तकावर नोंद घेवून इनक्रिमेंट स्टॉप करा ते शिकेपर्यंत.

**अनिल सावंत :-**

साहेब, आता तुम्ही ह्या लोकांना पगार किती देणार?

**दादासाहेब पाटील :-**

संगणक चालकला ५,०००/- रूपये देतो. आणि स्टेनोला ६०००/- रू. देतो.

**अनिल सावंत :-**

म्हणजे आता २००४ साला पासुन जे काम करतात त्यांना ५०००/- रूपये आणि आता जे येणार त्यांना सुध्दा ५०००/- रूपये.

**याकुब कुरेशी (पिठासीन अधिकार) :-**

ठराव सर्वांनुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७५ :-**

अस्थायी संगणक चालक यांचे तात्पुरते नेमणुकीबाबत तसेच मुदतवाढीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६७ :-**

महानगरपालिकेत प्रत्येक विभागाचे संगणीकरण करण्यात आले असून संगणीकरण केल्यामुळे महापालिकेत दि.२०/०६/२००६ पासून अस्थायी संगणक चालक यांची मानधनावर मा. महासभेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात

आली असून त्यावेळेपासुन त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु सद्यस्थितीत १४ संगणक चालक हे सोडुन गेलेले आहेत. त्यामुळे विविध विभागात संगणकीय काम करतांना संगणक चालका अभावी फार गैरसोयीचे होते. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात विशेषतः नागरी सुविधा केंद्रात जन्म मृत्यु विभाग, पाणी पुरवठा, कर विभाग इ. कामकाज चालते तेथे नागरिकांची नियमिती ये-जा असते अशा वेळी तेथे संगणक चालक उपस्थित असणे आवश्यक आहे. परंतु बरेच संगणक चालक सोडुन गेलेले असल्यामुळे खालील उमेदवारांची तात्पुरते संगणक चालक पदासाठी नेमणुक करण्यांत आली आहे.

| अ.क्र. | संगणक चालकाचे नाव | तात्पुरती नेमणूक दिनांक |
|---|---|---|
| १ | कु. मेरी प्रसया | १५/०९/२००९ |
| २ | कु. विक्रम विलास नाईक | २१/०७/२०१० |
| ३ | कु. गौरी विठ्ठल खराडे | २१/०७/२०१० |
| ४ | कु. प्रमोद दत्तात्रय पाटील | २१/०७/२०१० |
| ५ | कु. चेताली ह. मानकर | २१/०७/२०१० |
| ६ | कु. प्रविणा वि. सडवेलकर | २१/०७/२०१० |
| ७ | कु. स्वाती रविंद्र पाटील | २१/०७/२०१० |
| ८ | कु. भावना चं. पाटील | २१/०७/२०१० |

कु. मेरी प्रसया यांची प्रथम तात्पुरत्या पाच महिन्यांसाठी मानधनावर नियुक्ती दिलेली असल्याने सदरची मुदत दिनांक १४/०२/२०१० रोजी संपलेली असून त्यांना एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्यांकरिता तात्पुरती मानधनावर नियुक्ती दिलेली आहे. सदरची मुदत दिनांक १५/०८/२०१० रोजी संपली असल्याने संगणक चालकांची आवश्यकता पाहता एक दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्यांकरिता तसेच वरील सर्व संगणक चालकांना मा. महासभा दि. १८/०६/२००९ ठराव क्र. ५ नुसार रु. ५०००/- प्रति महिना (२६ दिवसा करिता) या मानधनावर सहा महिन्यांकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कमल ५३(१) अन्वये तात्पुरती नेमणुक केली आहे. सदर तात्पुरत्या संगणक चालकांच्या नेमणुकीस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. निर्मला सावळे.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, ही जी योजना आहे. पी.पी.पी. त्याचा जो कन्सलटन्ट नेमायचा आहे. इतर पूर्ण देशामध्ये टेक्नीकल फी किती परसेन्टेज देता? तुम्ही त्याचा रिन्यू वैगेरे घेतला आहे का? किती टक्के आहे?

**मा. आयुक्त :-**

एम.जी.पी. मध्ये ५.५० टक्के आहे. आणि नवि मुंबईला ३.५० टक्के आहे. आणि ठाण्याचा ४ टक्के आहे. आपण ३ टक्के देतो.

**अनिल सावंत :-**

ही जी कंपनी आहे. त्याला आपण मागे जेएनएनयुआरएम च्या केस मध्ये सस्पेंड केल. टंडन असोशिएट्सला सुपरवायझर म्हणून आपण त्याला नेमला होता. स्टॅण्डींग कमिटीने केला असेल पण तुम्ही इम्पलिमेंन्ट केल नसेल.

**मा. आयुक्त :-**

सस्पेंड केलेल नाही. अजुनही त्याच काम चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

याच देय कोण अदा करणार आहे? आपण खाजगी माध्यमातुन करणार होतो. तोच ठेकेदार घेवू.

**मा. आयुक्त :-**

त्यात ॲड होणार. आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे वायब्रीटीचे गॅप आहे. वायब्रीटीच ४० टक्के रक्कम त्यांनी करावी अशी प्रशासनाने मंजुरी दिली.

**जुबेर इनामदार :-**

कन्सलटंटने आणायच असते ना. लोन अप्रोर करून त्यांनीच आणायच असते ना.

**अनिल सावंत :-**

त्यांनी कुठच्या महापालिकेसाठी काम केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

भिवंडीला करतो, स्टेम करतो, नवि मुंबईला करतो, कुळगाव-बदलापुरला करतो.

**अनिल सावंत :-**

म्हणजे टोटल प्रोजेक्ट कास्ट आहे तो १३०० करोड रू. चा त्याच्यावर ३ टक्के देणार.

**मा. आयुक्त :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

प्रकरण क्र. ७६, मिरा भाईंदर शहराच्या पाणी पुरवठा योजनेबाबत प्रकल्पतज्ञांची सेवा घेणेबाबत. ठराव, दि. ७ ऑगस्ट २०१० रोजीच्या दै. वृत्तमानस व दै. आफ्टरनून व्हॉईस या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यांत आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा आर्थिक क्षमता निकष तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | कमीत कमी गुणांचा आर्थिक क्षमता निकष |
|---|---|---|
| १ | मे. शाह टेक्निकल कन्सलटंट प्रा.लि. (STC) | ४.५% |
| २ | मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. (TUSPL) (दर वाटाघाटी व चर्चेअंती) | ३.००% सर्व्हिस टॅक्स वगळून |

उपरोक्त तक्ता पाहता मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. (TUSPL) यांनी दर कमी करुन सादर केलेले दर लघुत्तम आहेत. उपरोक्त दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस तसेच सदर कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, विषय निघाला म्हणुन बोलतो. हा विषय पाणी पुरवठ्याचा जरी असला तरी जेएनएनयुआरएम ला म्हणजे भुयारी गटर मार्गाचा जे काम आपल्या शहरामध्ये चाललेला आहे. त्या विषयावर मी तुमच लक्ष केंद्रीत करू इच्छितो. साहेबस मला वाटत ८ टक्के किंवा ९ टक्के आजपर्यंत काम झालेले आहे. या १९ महिन्यामध्ये. आपण नव्हता तेव्हा या स्थायी समितीमध्ये आढावाची मिटिंग घेण्यात आली होती. योगायोगाने तुम्ही त्या सभेमध्ये नव्हता. वाकोडे साहेबांनी डिसप्ले वैगेरे आणला होता आणि ठेकेदार पण आला होता. पण आपल्या इथे फक्त ४ टक्के काम झालेले आहे. त्या विषयाला वर्ष होवून गेले. आज आम्ही फक्त ८ टक्के वर पोहचलो आहे. आमच्याकडे एका झोनवरती काम चालू आहे आमचा तो क्षेत्र असल्यामुळे आणि त्याच्यावर मला रस्ता करुन घ्यायचा आहे तर नियंत्रण त्याकामावर माझ होते. मी तिथे बघत होतो. त्याच्याकडे फक्त ठराविक फक्त टिम आहे काम करण्यासाठी. ४-५ इंजिनियर आहे आणि सध्या जो सेटअप आहे शंभर-दोनशे मिटर रस्ता असेल. जिथे आजच्या तारखेमध्ये भुयारी गटाराच काम चालू आहे. पाईप लाईन लिक करतात. आणि ६ चेंबर फक्त त्या लोकांनी तयार केलेले आहे. पूर्ण महिना त्याचा गेला. माझा निष्कर्ष या विषयावर असायचा की त्याच्याकडेच टिमच कमी आहे. त्याच्याकडे जे साहित्य लागते ते तेव्हाच आहे. साहेब, अशा प्रकारे त्यांनी काम केल तर आपण २०१५ पर्यन्त या शहराचे काम करु शकणार नाही. आणि त्याचा कॉस्ट त्याला परवडणार नाही तो हात वर करणार आणि आपण रस्त्याला अर्थवट काम करुन सोडून देवू शकत नाही. उद्या परत तो वाटाघाटी करिता येणार. परत त्यातुन आपण काहीतरी मार्ग काढु. परत त्याला आपण पैसे वाढवून देवू. साहेब, कुठेतरी या शहराचा नुकसान होणार. आपण याचा आढावा घ्या. हा विषय चर्चेला नसतानाही हा विषय घेतला. साहेब, आपण त्यांना ५० कोटी रू. ॲडव्हान्स दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

३५ कोटी रिकवर केलेले आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

काम वेळेवर होत नाही म्हणून आपण त्याचा दंड लावतो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तो सेट अप तुम्ही स्वतः बघितलाना तर तेवढाच सेट आहे. पूर्ण शहरामध्ये एकच जागेवर काम चालू आहे. त्यांच्याकडे बाकी कामच चालू नाही. कारण तो करूच शकणार नाही. दुसरीकडे त्याच्याकडे साहित्यच नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, आम्ही फॉलो अप करतो.

**अनिल सावंत :-**

साहेब, याच्यामध्ये टेक्निकल सुपरवायझर रिपोर्ट तुम्हाला काय देतात? ज्याला आपण फिस देतो. त्याच्यासाठी टेक्नीकल सुपरवायझर नेमलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी आपल्याला नोटिस दिली तर याचा अर्थ काम होणार. आम्ही पण नोटिस दिल्या. पण त्यांच म्हणन आहे की, पावसाळा संपल्याबरोबर माझा स्पिड बघा. आणि त्यांनी सिंगापूर वरून मशीन आणलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मशिन नाही. ते लाकडाची साईट मध्ये माती पडली नाही पाहिजे. त्यासाठी शेटर बनवतात. त्याच्या ऐवजी त्यांनी लोखंडी आणलेली आहे. जे पार्टिशन्स असतात. शेटर्स त्याला म्हणतात. त्यांनी तो जर्मन टेक्नॉलॉजी म्हणुन इमपोर्ट घेवून आलेला आहे.माझ म्हणन एवढच आहे. त्याचा जो सेट अप आहे तो पूर्ण शहरामध्ये काम करण्यासाठी अपूर्ण आहे. काम ज्या गतीने चालू आहे ते २०१५ पर्यंत सुध्दा होणार नाही. एक रस्ता खोदला की त्याला करायला पूर्ण २ महिने पाहिजे. मी त्याचा सातत्याने पाठपुरावा करतो. दिवस रात्र माझी लोक तिथे त्याच्या समोर असतात. कारण आम्हाला आमचा तो रस्ता कम्प्लीट करून घ्यायचा आहे. आमचे आमदार मुझफ्फर हुसेन यांचे हॉस्पीटल आहे. त्याच उद्घाटन आहे त्या रस्त्यावर त्याच्या सातत्याने मी पाठपुरावा करतो. त्याचा काय प्रॉब्लेम आहे? त्याची क्षमता काय आहे. काम करायची ती दिसुन येते.

**अनिल सावंत :-**

साहेब, मागे सुध्दा विषय झाला होता. त्याच्यामध्ये सुध्दा सांगितले होत की बघतो. रिपोर्ट देतो. पण काही झाल नाही. त्या मिटींगला तुम्ही नव्हते का? चर्चा झाली त्यावेळी? आम्ही अर्धा दिवस चर्चा केली होती.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये आपण त्याला बंधी घातली होती. पावसाळ्यामध्ये कुठेही खोदाई करायची नाही. त्याला एस.टी.पी. प्लान्टच काम ३० दिवसात कर म्हणुन सांगितल होत. म्हणजे त्याने डिमोलिशन केल आणि एस.टी.पी प्लान्टच काम सुरु केल. रोडला हात लावायचा नाही म्हणुन सांगितल होत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, चार महिने पावसामुळे काम बंद होते त्याचा वादच नाही. फक्त त्याच्याकडे सध्या साहित्य किंवा इन्स्ट्रुमेंट आपण बोलतो एवढ मोठ त्याने काम घेतलेल आहे. आज त्याने करायला सरुवात केली. त्यांनी सांगितल पाऊस गेला १५ दिवस झाले तरीपण एकाच झोनवर काम चालू आहे दूसरीकडे तो करुच शकत नाही कारण त्यांच्याकडे वस्तुच available नाही. काम करायला जे वस्तु लागतात, साहित्य लागते ते त्यांच्याकडे नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, पावसाळ्याच्या आत मी त्याला ३ ठिकाणाची काम सांगितली होती तर त्याने तीन ठिकाणाची काम करून घेतली.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ८ टक्के काम झाल. त्यांनी पावसाळ्याच्या आधी बघितल.

**मा. आयुक्त :-**

सर्वात महत्वाच म्हणजे आपण ज्या जागा निवडल्या ते मायनर मोडीफिकेशन मधल आहे. मायनर मोडिफिकेश सॅन्शन होवून आता मिळाली. त्यानंतर प्लान तयार करून आपण आयआयटी ला अस आम्ही बनवतो. म्हणून सॅन्शन करायला गेलो होतो. सॅन्शन आल्यानंतर त्याचा वर्क ऑर्डर दिली. आणि रोड आपण खोदाई करून दिली नाही. त्यामुळे लेट झाल. आता जर लेट करायला लागला तर आपण मा. महासभेमध्ये त्याला बोलवू.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुम्ही जातीने ह्याच्यात लक्ष द्या. नाहीतर हे आपल्याला आर्थिक दृष्टीकोनातुन हे परवडण्यासारख नाही.

**मा. आयुक्त :-**

तुमच म्हणन बरोबर आहे. आम्ही तुम्हाला इथे थोडस सांगतो तरी. आम्हाला मंत्रालयात दर महिन्याच्या जे.एन.एन.यु.आर.एम. च्या मिटींगमध्ये उत्तर द्यायच मुश्किल झालेल आहे. कारण आम्ही वर्क ऑर्डर दिल्यानंतर तिथे आमची टक्केवारी फक्त ८ आहे. म्हणुन आम्ही नोटिसावर नोटिस त्याला दिले आहे. शेवटी त्याच्या मालकाला बोलवायला सांगितल बँगलोर वरून. तुमच्या स्टाफशी बोलून काय करायच म्हणून मालकाला बोलवा. आणि स्ट्रिक्टली सर्व भागामध्ये काम सुरू झाल पाहिजे असे सांगितल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपली चर्चा झाली होती. त्याचा बुलेट्स पॉईंट्स द्या. मायलेज, माईल स्टोन आपण त्याला बोलतो. हा क्षेत्र तुझा या एवढ्या कालावधीमध्ये झालाच पाहिजे. अशा प्रकारे त्याला माईल स्टोन द्यायला लागतील. ते कुठेही ॲग्रीमेन्ट मध्ये नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण करू.

**प्रकरण क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर शहराच्या पाणी पुरवठा योजनेबाबत प्रकल्पतज्ञांची सेवा घेणेबाबत.

**ठराव क्र. ६८ :-**

दि. ७ ऑगस्ट २०१० रोजीच्या दै. वृत्तमानस व दै. आफ्टरनून व्हॉईस या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यांत आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा आर्थिक क्षमता निकष तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | कमीत कमी गुणांचा आर्थिक क्षमता निकष |
|---|---|---|
| १ | मे. शाह टेक्निकल कन्सलटंट प्रा.लि. (STC) | ४.५% |
| २ | मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. (TUSPL) (दर वाटाघाटी व चर्चेअंती) | ३.००% सर्व्हिस टॅक्स वगळून |

उपरोक्त तक्ता पाहता मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. (TUSPL) यांनी दर कमी करुन सादर केलेले दर लघुत्तम आहेत. उपरोक्त दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस तसेच सदर कामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार.** **अनुमोदन :- श्रीम. हेलन गोविंद.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

प्रकरण क्र. ७८, शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाची कंपनी म्हणून स्थापना. ठराव, शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाकडुन ठाणे, मिरा-भाईंदर व भिवंडी-निजामपूर या महानगरपालिकांना पाणी पुरवठा केला जात आहे. सदर प्राधिकरणाची भारती कंपनी कायदा १९५६ अन्वये सर्वसाधारण कंपनी स्थापन करुन कायदेशीर स्वरुप देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. कंपनीचे भागभांडवल ठरविताना ते मत्तेच्या चालू मुल्य निर्धारण किंमतीच्या आधारावर प्रतिशत प्रमाण ठरविण्याचे प्रस्तावित आहे.

सदर भागभांडवल प्रतिशत प्रमाण हे मत्तेच्या चालू मुल्य निर्धारण किंमतीच्या आधारावर न ठरविता सद्यस्थितीत पुरविण्यात येणाऱ्या पाण्याच्या हिश्श्यानुसार (कोट्यानुसार) व भविष्यात मंजूर होणारा कोट्याचे सध्याच्या हिश्श्यानुसार वाटप करण्यात यावे, या बाबींचा अंतर्भाव करुनच प्रस्तावित कंपनीचे कायदेशीर दस्तऐवज जसे Memorandum of Association, Articles of Association व Shareholders Agreement हे कंपनी नोंदणीकरणाच्यावेळी सादर करावेत. याप्रमाणे शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणास कळविण्यास व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**याकुब कुरेशी (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७८ :-**

शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाची कंपनी म्हणून स्थापना.

**ठराव क्र. ७० :-**

शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाकडुन ठाणे, मिरा-भाईंदर व भिवंडी-निजामपूर या महानगरपालिकांना पाणी पुरवठा केला जात आहे. सदर प्राधिकरणाची भारती कंपनी कायदा १९५६ अन्वये सर्वसाधारण कंपनी स्थापन करुन कायदेशीर स्वरुप देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. कंपनीचे भागभांडवल ठरविताना ते मत्तेच्या चालू मुल्य निर्धारण किंमतीच्या आधारावर प्रतिशत प्रमाण ठरविण्याचे प्रस्तावित आहे.

सदर भागभांडवल प्रतिशत प्रमाण हे मत्तेच्या चालू मुल्य निर्धारण किंमतीच्या आधारावर न ठरविता सद्यस्थितीत पुरविण्यात येणाऱ्या पाण्याच्या हिश्श्यानुसार (कोट्यानुसार) व भविष्यात मंजूर होणारा कोट्याचे सध्याच्या हिश्श्यानुसार वाटप करण्यात यावे, या बाबींचा अंतर्भाव करुनच प्रस्तावित कंपनीचे कायदेशीर दस्तऐवज जसे Memorandum of Association, Articles of Association व Shareholders Agreement हे कंपनी नोंदणीकरणाच्यावेळी सादर करावेत. याप्रमाणे शहाड-टेमघर पाणी पुरवठा प्राधिकरणास कळविण्यास व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार.** **अनुमोदन :- श्रीम. हेलन गोविंद.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

अवलोकन आहे.

**याकुब कुरेशी (पिठासीन अधिकारी) :-**

अवलोकन सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७७ :-**

**मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)**

**ठराव क्र. ६९ :-**

महापालिका आरोग्य विभागाकरिता डास अळीनाशके, दुर्गंधीनाशके, किटकनाशके, फॉग मशीन खरेदी करणे, स्प्रे पंप मशीन खरेदी करणे आदि कामे करण्यात आली आहेत. सदर कामी येणारा खर्च खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | निविदाकाराचे नाव | कामाचा तपशिल | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | Pyrosene Oil – E | रु. ९,४५,७५०/- |
| २ | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी<br>मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | १९ टक्के रिजेक्ट मटेरियल उचलणेकामी डंपर, जे.सी.बी. पुरवठा | रु. १०,००,०००/- |
| ३ | मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा.लि. | Koriyan Fogar XL Fog Machin | रु. ९,९८,८४०/- |
| ४ | मे. जॅग्स इम्पेक्स | Jag 24 8EKD Water H.P. Cleaner Engine Driven | रु. ६,९३,००४/- |
| ५ | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी<br>मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | १९ टक्के रिजेक्ट मटेरियल उचलणेकामी डंपर, जे.सी.बी. पुरवठा | रु. १०,००,०००/- |
| ६ | मे. लक्षता ट्रेडिंग कंपनी | कार्बोलिक पावडर | रु. ८,४०,०००/- |
| ७ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | किंग फॉग १.२५ यु.एल.व्ही. | रु. ६,८०,०००/- |
| ८ | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी<br>मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | १९ टक्के रिजेक्ट मटेरियल उचलणेकामी डंपर, जे.सी.बी. पुरवठा | रु. १०,००,०००/- |
| ९ | मे. बॉम्बे जी.सी.बी. अर्थ मुव्हर्स | जे.सी.बी. मशीन व पोकलन मशीन दुरुस्ती | रु. ६,०२,७७२/- |

वरील कामांची खरेदी करणेकामी हि सभा मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**याकुब कुरेशी (पिठासीन अधिकारी) :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. ३.०० वा. )**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**